## महाराष्ट्र शासन

**अत्यंत तातडीचे**

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉप्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- २८ मार्च २०२०

प्रति,

विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)

**विषय: महाराष्ट्राच्या सिमेवर किंवा महाराष्ट्रातील जिल्ह्याच्या सिमेवर येणाऱ्या प्रवाशांबाबत करावयाची कार्यवाही...**

**संदर्भ : महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२०/प्र.क्र.१२३/म-३, दि.२८.०३.२०२०**

महाराष्ट्र राज्यामध्ये कोविड-१९ या आजाराचा झपाट्याने प्रसार होत आहे. या आजाराचे रुग्ण सर्वच विभागांमध्ये आढळून आले आहेत. कोविड-१९ नियंत्रणाचा एक भाग म्हणून राज्यामध्ये संपुर्ण Lock Down करण्यात आले आहे. तथापि, महाराष्ट्रातील तसेच काही कारणांमुळे परराज्यात गेलेले प्रवासी, स्थलांतरित कामगार, बेघर, इ. राज्यामध्ये परत येत आहेत. त्यातील बरेचसे पायी व मिळेल त्या रस्त्याने येत आहेत. या प्रवाशांकडून कोविड-१९ चा प्रसार होऊ शकतो, ही बाब लक्षात घेता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:-

१) वर नमुद केल्यानुसार राज्यांतील जिल्ह्याच्या सीमेवर किंवा राज्याच्या सीमा भागातील जिल्ह्यांमध्ये जे प्रवासी, स्थलांतरित कामगार, इ. येतील त्यांना वर नमूद केल्यानुसार आहे त्या ठिकाणी प्रत्येक जिल्ह्यांमध्ये अलगीकरण (Quarantine) मध्ये ठेवण्यात यावे. त्या ठिकाणी त्यांना आवश्यक मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) परराज्यातून आलेले प्रवासी, स्थलांतरित कामगार व बेघर यांना महसुल विभागाने दिलेल्या वास्तव्याच्या ठिकाणी आणल्यानंतर तेथून जवळ असणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना कळविण्याच्या सुचना संबंधितांना द्याव्यात.

३) वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सर्व प्रवाशांची वैद्यकीय तपासणी करुन आवश्यकतेनुसार औषधोपचार करावेत. गरोदर माता / बालके यांची विशेष काळजी घ्यावी.

४) वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सर्व प्रवाशांना कोविड-१९ आजार व या आजाराच्या प्रतिबंधासाठी वैयक्तिक आणि सार्वजनिक स्तरावर घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर आरोग्य शिक्षण द्यावे.

५) प्रवाशांमध्ये ताप (१००F च्या पुढे), खोकला-धाप लागणे अशी लक्षण असणारे प्रवाशी असल्यास पुढील तपासणीसाठी त्यांना रुग्णवाहिकेने जिल्हा रुग्णालय येथे संदर्भीत करावे.

६) जिल्हा रुग्णालयांमध्ये संशयित कोविड-१९ कक्षामध्ये या सर्वांना दाखल करावे आणि त्यांच्या घशातील स्त्रावाचा नमुना घ्यावा. चाचणी अहवाल समारात्मक आल्यास त्वरित आयसोलेशन कक्षात दाखल करावे. अहवाल नकारात्मक आल्यास महसुल विभागाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पुढील कार्यवाही करावी.

७) रुग्णांची चाचणी सकारात्मक आल्यास त्यांच्या सहवासितांची संपूर्ण माहिती घ्यावी व त्यांना स्वतंत्रपणे १४ दिवसांसाठी (Quarantine) मध्ये ठेवावे व लक्षणे आढळून आल्यास पुढील कार्यवाही करावी.

८) ५०० पेक्षा जास्त प्रवासी एका ठिकाण असतील तर, तेथे वहुविध आरोग्य सेवक (पुरुष) यांना २४ तास उपलब्ध ठेवण्यात यावे.

प्रवासी, स्थलांतरीत कामगार आणि वेघर याचेमुळे स्थानिक जनतेमध्ये कोविड-१९ आजार पसरु नये यासाठी उपरोक्त नुसार कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. प्रदीप व्यास)
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई
प्रत संचालक, आरोग्य सेवा मुंबई / पुणे
प्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्रत मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
प्रत मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
प्रत मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव

COVID-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेली परिस्थिती हाताळण्यासाठी लेखाशीर्ष २२४५०२४४ अंतर्गत वितरित केलेल्या निधीमधून मदत उपाय योजनांवरील ( Relief Measures) खर्च भागविण्यासाठी अनुमती देण्याबाबत .....

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन निर्णय,क्रमांक: सीएलएस-२०२०/प्र.क्र.१२३/म-३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २८ मार्च,२०२०

संदर्भ : १. केंद्र शासन,गृह मंत्रालय,यांचे पत्र क्र. ३३-४/२०२०-MDM-I, दिनांक १४ मार्च, २०२०
२. शासन निर्णय, समक्रमांक, दिनांक: १६.३.२०२०
३. केंद्र शासन,गृह मंत्रालय,यांचे पत्र क्र. ३३-०४/२०२०-MDM-I, दिनांक २८ मार्च, २०२०
४. केंद्र शासनाचे पत्र क्रमांक ३२-७/२०१४-NDM-I,दिनांक ८.४.२०१५
५. शासन निर्णय क्रमांक: सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दिनांक १३.५.२०१५

प्रस्तावना:

देशात व राज्यामध्ये COVID-१९ विषाणुचा प्रादुर्भाव झाल्यामुळे रोगराई नियंत्रित करण्याची आवश्यकता विचारात घेवून आवश्यक उपाययोजना करण्यासाठी राज्य कार्यकारी समितीची दिनांक १६ मार्च, २०२० रोजी मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत राज्य कार्यकारी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार COVID-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामुळे पसरणारी रोगराई नियंत्रित करण्यासाठी विलगीकरण कक्ष स्थापन करणे,त्यासाठी तात्पुरती निवासी व्यवस्था करणे, अन्न, कपडे, वैद्यकीय देखभाल इत्यादी तसेच अतिरिक्त चाचणी प्रयोगशाळा स्थापन करण्याचा खर्च, अग्निशमन, पोलीस,स्थानिक स्वराज्य संस्था व आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक संरक्षणासाठी प्रतिरोधक साधनांचा खर्च व व्हेंटीलेटर,हवा शुध्दीकरण यंत्र, थर्मल स्कॅनर्स व इतर साधनांचा खर्च भागविण्यासाठी सर्व जिल्हयांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये रू ४५ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. या निधीमधून लॉकडाऊन उपाययोजनामुळे राज्यात अडकलेले, मदत छावण्या व इतर ठिकाणी आश्रय घेतलेले स्थलातंरित कामगार व बेघर व्यक्ती यांना अन्न,वस्त्र, निवारा व वैद्यकीय देखभाल पुरविण्यासाठी होणारा खर्च अनुज्ञेय करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

देशात व राज्यामध्ये COVID-१९ विषाणुचा प्रादुर्भाव झाल्यामुळे रोगराई नियंत्रित करण्याची आवश्यकता विचारात घेवून उपाययोजना करण्यासाठी राज्य कार्यकारी समितीची दिनांक १६ मार्च, २०२० रोजी मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत राज्य कार्यकारी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार COVID-१९ विषाणुच्या प्रादुर्भावामुळे पसरणारी रोगरोई नियंत्रित करण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या बाबीवरील खर्च भागविण्यासाठी राज्य आपत्ती



Scanned with CamScanner

DS(W)

प्रतिसाद निधीमधून ( S.D.R.F.) रूपये ४५,००,००,०००/- (रूपये पंचेचाळीस कोटी फक्त) विभागीय आयुक्तांना वितरित करण्यात आला आहे.

२. संदर्भाधीन क्रमांक ५ येथील शासन निर्णयातील अनुक्रमांक ३ (अ) येथे नमूद केलेल्या " मदत छावणीमध्ये आश्रय घेतलेल्या व्यक्तींकरिता तात्पुरती राहण्याची व्यवस्था, अन्न,कपडे व औषधोपचार" या बाबीमध्ये कोव्हीड-१९ विषाणूचा राज्यातील फैलाव रोखण्यासाठी **लॉकडाऊन उपाययोजनामुळे राज्यात अडकलेले, मदत छावण्या व इतर ठिकाणी आश्रय घेतलेले स्थलांतरित कामगारांसह बेघर व्यक्ती यांना अन्न,वस्त्र, निवारा व वैद्यकीय देखभाल पुरविण्यासाठी होणारा खर्च अनुज्ञेय राहील.** यापूर्वी संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेल्या रूपये ४५ कोटी निधीमधून वरील खर्च करण्यास जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. या संदर्भातील केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक २८.३.२०२० च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( सु.ह.उमराणीकर )
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधान परिषद), विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
४. महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय विधान सभा/विधान परिषद सदस्य,
५. अपर मुख्य सचिव ( वित्त ), मंत्रालय,मुंबई,
६. प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग ),जी.टी.हॉस्पीटल, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव,सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,मंत्रालय,मुंबई,
८. संचालक (आरोग्य सेवा), महाराष्ट्र राज्य,मुंबई,
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. सर्व जिल्हाधिकारी,
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१२. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
१३. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१५. मा.मंत्री(मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१६. मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१७. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१८. कार्यासन अधिकारी (म-११/म-३), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१९. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
२०. निवड नस्ती (कार्यासन/ म-३ )

C:\Users\medha.gadgil\Desktop\कोरोना\16032020.docx

Scanned with CamScanner

No. 33-04/2020-NDM-I
Government of India
Ministry of Home Affairs
(Disaster Management Division)

'C' Wing, 3rd Floor, NDCC-II,
Jai Singh Road, New Delhi,
Dated 28th March, 2020

To

The Chief Secretaries
(All States)

**Subject: Item and Norms of assistance under State Disaster Response Fund (SDRF) in the wake of COVID-19 Virus Outbreak.**

Sir/ Madam,

I am directed to refer this Ministry's letter No. 33-4/2020, dated 14th March 2020 on the above mentioned subject and to say that the existing norms issued vide this Ministry letter no 32-7/2014-NDM-I dated 08.04.2015, under item no 3(a) "***Relief Measures - Provision for temporary accommodation, food, clothing medical care etc.***" would be applicable to homeless people, including migrant labourers, stranded due to lockdown measures, and sheltered in the relief camps and other places for providing them food etc., for the containment of spread of Covid-19 virus in the country.

Yours faithfully,

28/03/2020

(Sanjeev Kumar Jindal)
Joint Secretary to Government of India
Tel: 23438096

Copy to AS(UT), MHA for making similar provisions for utilization of UT Disaster Response Funds by the Union Territories.

CC for information: PS to HM/MOS(N)/HS/ Secretary (Expenditure).

Scanned with CamScanner